**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी**

तारीखः-१०/०१/२०१८

## कोटेशन नोटीस

भिवंडी निजामपूर शहर महानगरपलिका महापालिकेच्या वाहन विभागात खालील कामाची कोटेशन दि. १८/०१/२०१८ रोजी दुपारी १.०० वाजेपर्यंत मागविणेत येत आहेत. कामाबाबतची संपुर्ण माहिती वाहन व्यवस्थापक, वाहन विभाग यांचेकडून घेऊनच कोटेशन भरावीत मागाहुन कोणत्याही प्रकारची तक्रार विचारात घेतली जाणार नाही. तसेच कोटेशन भरताना सर्व करांसहित व खर्चासहित भरावीत. मागाहून कोणत्याही कारणास्तव जास्त मागणीचा विचार केला जाणार नाही. कमी किंवा जास्त दराची कोटेशन नाकारणेचा अधिकार खालील सही करणार यांनी राखुन ठेवलेला आहे. उशिरा आणलेली कोटेशन कोणत्याही कारणास्तव स्विकारली जाणार नाहीत.

**पाणी पुरवठा विभागाकडील मनपा वाहन क्र. एमएच-०४-एएम-१६०(वॉटर टँकर) या वाहनाची दुरुस्ती करणे बाबत.**

१) जॉईंटचे ०८ नग खोलून जॉईंट बाजुला करणे. २) गेअर फाऊंन्डेशनचे ०४ नग बोल्ट खोलून गेअर बॉक्स जॅकच्या साहयाने खाली उतरविणे. ३) क्लज फार्क बाजुला करुन थ्रस्ट बेरींग बाजुला करणे. ४) प्रेशर प्लेटचे ०८ नग बोल्ट खोलून क्जज प्लेट व प्रेशर प्लेट खाली उतरविणे. ५) फ्रॉयव्हीलचे ०६ नग बोल्ट खोलून फ्रॉयव्हील खाली उतरविणे व लेथ मशिनव पॉलिश फेसींग करणे. ६) नविन क्लज प्लेट व प्रेशर प्लेट फिट करुन ०८ नग बोल्ट फिटींग करणे. ७) नविन क्लज थ्रस्ट बेरींग फिट करुन फॅार्क फिट करणे. ८) गेअरबॉक्सला जॅकच्या साहयाने फाऊंन्डेशवर फिट करणे. ९) क्लजचे दोन्ही सिलेंडर अप्पर व लोअर नविन फिट करुन १/२ लिटर ब्रेक ऑईल भरुन एअर काढणे. १०) जॉईंटचे ०८ नग नविन नटबोल्ट फिट करुन जॉईंट फिट करुन गाडीची पुर्ण क्लजची दुरुस्ती करणे.

**हवेची व ब्रेकची दुरुस्ती :-** वाहनाची हवा जास्त प्रमाणात लिकेत होत असल्याने वाहनास ब्रेक लागत नसल्याने खालील दुरुस्ती करणे.

१) क्रॅाम्प्रेसरचा हेड खोलून त्याचे रिंग व पिस्टन खराब झालेला असल्याने पिस्टन, रिंग व पॅकींग नविन फिट करणे. २) एअर पाईप २२ एमएम., २८ एमएम., १४ एमएम., सर्व पाईप चेक करुन खराब झालेला पाईप बाहेर काढुन त्याजागी नविन पाईप फिटींग करणे. ३) कॅबिन मधील ०४ व्हे एअर बुस्टर चेक करुन त्याचे किट बदली करणे. ४)अनलोडर व्हॅालची तपासणी करुन तो खराब असल्यास एअर अनलोडर व्हॅाल नविन फिट करणे. ५) पुढच्या व मागच्या टायरकडील एअर बुस्टर डायफाम रबर बदली करणे. ६) एअर टॅंक चेक करुन टाकीजवळ असलेला व्हॅालची तपासणी करु तो रिपेरिंग करणे. ७) एअर टाकीचे लिकेज चेक रुन ड्रेन व्हॅाल नग ०२ नविन फिट करणे. ८) एअर मिटर ०२ नग नविन फिटींग करणे.

Choudhari

**वाहन व्यवस्थापक**
**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी.**

---

**तारीख :-** १०/०१/२०१८

**खालील ठिकाणी प्रसिध्द केली.**

१) मनपा संकेतस्थळ

२) मुख्य कार्यालय नोटीस बोर्ड